भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०२/२०१८

१) अवैध रित्या जनावरे वाहतुक करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक १४/०२/२०१८ चे ०७.४० वाजता यातील आरोपी क्र. १ ने त्याचे ताब्यातील वाहन व सोबत आरोपी क्र. ०२ व ०३ सह ट्रक मध्ये एकुन ४५ जनावरे (गायी, गोरे, व हेले ) कि. १,२०,०००/रु व ट्रक क्र. एमएच ४० ए.के. ९५८६ कि. १०,०००००/रु. असा एकुन ११,२०,०००/रु. चे ट्रक मध्ये भरून डांबुन , कोंबुन तसेच निदर्यतेची वागणुक देवुन जनावरांचा चारा पाणी तसेच वैद्यकिय प्रमाणपत्र सोबत न बाळगता व जनावरे कत्तली करीता अवैध वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. रामटेके वा.नि.शा. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११,(१)(ड)(इ) प्रा.णी.वा. का. सहकलम ५ (अ)(१)प्रा.सं.अधी. सहकलम ६६/१९२ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

२) नगदी पैसे व सामानाची चोरी :—

दिंनाक १२/२/२०१८ चे २३.३० वाजता दरम्यान यातील आरोपी याने फिर्यादीचे मोकळया जागेवर ठेवलेले बॅग मधील १२००/रु. आधार कार्ड १ कि. ००/रु. ईलेक्शन कार्ड १ कि. ००/रु. असा एकुन १२००/रु. चा माल चोरून नेले व फिर्यादीला मारण्याची धमकी दिल्याने ,फिर्यादी संतोष राम देवुरकर वय ३२ वर्ष रा.बोरगाव मेघे पो.स्टे सांवगी जि.वर्धा ह.मु.रेल्वे टाऊन तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोना. राघोर्ते पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

३) ट्रकच्या धडकेत एक जखमी:—

दिंनाक १२/२/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव, वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचा भाऊ धंनजय रामचंद्र वैदय हा पायी जात असता ,त्याचे उजवे हाताला धडक मारून जखमी करून पळुन गेल्याने , फिर्यादी एकनाथ रामचंद्र वैद्य वय ३८ वर्ष रा. शिवनाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

४) क्षुल्लक कारणावरून भांडण करून चाकुने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:—

दिंनाक १४/२/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन घरगुती कारणा वरून आपसात वाद आहे ,बोलाचाली बंद आहे, फिर्यादीची मुलगी ही अंगणात झाडु मारीत असता, फिर्यादीची जावु हीने फिर्यादीचे मुलगी हिला तुमची कोंबडी आमच्या अंगणात येवुन कचरा करते, या कारणा वरून आपसात शाब्दीक भांडण सरू असतांना, फिर्यादी ही त्यांचे भांडण सोडवीण्यास गेली असता, आरोपी क्र. ०१ व ०२ याने शब्दीक भांडण करून, शिवीगाळ केली व आरोपी क्र. ०२ ने फिर्यादीचे केस पकडुन खाली पाडल्यानंतर आरोपी क्र. १ ने भाजी कापण्याचे चाकुने फिर्यादीचे हाताचे मनघटावर मारून जखमी केल्याने, फिर्यादी श्रीमती देवका गणपत वाघधरे वय ४५ वर्ष रा. रामपुरी वार्ड यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. चौधरी पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

५) संगनमत करून लाता बुक्यानी मारपीट करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:—

दिंनाक १३/२/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीच्या कुत्र्याला आरोपी ०१ ने लाथा मारल्याने, फिर्यादीने त्यास हटकले असता, यातील आरोपी क्र. ०१ ते ०७ यांनी संगनमत करून फिर्यादीचे घरात घुसुन फिर्यादीस लाथ— बुक्यांने मारपीट केली, व शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी रूषी रावजी ईनवाते वय ४० वर्ष रा. खेडेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५२,१४३,१४७,५०४,५०६,३२३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

६)संगनमत करून भांडण करून काठीणे मारून दुखापत केल्याने गुन्हा नोंद:—

दिंनाक १३/२/२०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा घरून हॉटेल मध्ये खर्रा घेण्यास जात असता, आरोपीचा कुत्रा भुंकत—भुकत चावण्यास धावला असता, फिर्यादी हा तेथे थांबला तेव्हा आरोपीने त्यास शिवीगाळ केली, तेव्हा फिर्यादीने हटकले असता, यातील आरोपीने, काठीणे दोन्ही पायावर मारून कॉल्लर पकडुन आरोपीने आपले घरात ओढुन घरातील समोरील दार बंद करून, फिर्यादीला अन्यायाने अटकावुन ठेवुन, आरोपी क्र.०१ व ०२ याने संगनमत करून शिवीगाळ करून मारपीट केल्याने, तसेच भांडण सोडविण्यास फिर्यादीचा काका मदन हा आला असता, त्याचे डावे हातावर काठीणे मारून दुखापत केल्याने, फिर्यादी हर्षवर्धन उर्फे गुड्ड गोवर्धन ईलमकर वय २१ वर्ष रा. खेडेपार यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३४२,३२४, ५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

७) पैश्यासाठी विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद :–

सन २०१३ ते आज पावतो यातील आरोपीतांनी संगनमत करून भावाचे नौकरी करीता फिर्यादीला तु आपले आई वडीलाकडुन ५०,०००/रु. ते १,०००००/रु. मागुन आन असे बोलुन, फिर्यादीला शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने, फिर्यादीचे तोंडी वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४९८(अ),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १४/०२/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन चांदणी चौक येथे येणा–या जाणा–या लोकांना व वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. गजभिये यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. गजभिये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

९) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक १४/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, भंडारा, करडी कारधा, तुमसर ,आंधळगाव लाखणी, पवनी, दिघोरी वरठी पवनी , लाखनी , व लाखांदुर येथे अवैध दारू /जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण १८ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६६ लिटर हातभट्टी दारू कि. ६०००/रु. व २ लिटर ५२० मिलीलीटर देशी दारू किमती ७६८/रु. तसेच जुगारातुन ८८२६/रु. असा एकुन १५,५९४/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १४/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनाकरीता १८ ईतर वाहनांवरती – ७० केसेस करण्यात आले आहे.

( आर.आर. भागरे )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९४२१७२७१८९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.